प्रेस नोट दिनांक -१४.०३.२०१९

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग यांचेकडून अवैध शस्त्र बाळगणा-या इसमावर कारवाई.

---

लोकसभा निवडणुक २०१९ ची आचारसंहीता दि. १०.०३.२०१९ रोजी पासुन संपुर्ण देशात लागु करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्हयात कायदा व सुव्यवस्थोचा कोणताही प्रश्न निर्माण होवु नये याकरीता सराईत गुन्हेगार यांचेवर प्रतिबंधक कारवाई करण्याचे तसेच सिंधुदुर्ग जिल्हयात अवैध शस्त्रे बाळगणारे इसमांवर कारवाई करण्याबाबत सक्त आदेश मा. पोलीस अधीक्षंक, सिंधुदुर्ग श्री दिक्षीतकुमार गेडाम व मा अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग श्री निमित गोयल यांनी सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे प्रमुख व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग यांना दिलेले होते.

त्याअनुसार पोलीस निरीक्षक पी. एन. पाटील स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदुर्ग यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना अवैध शस्त्रे बाळगणारे इसमांवर कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या. आज दि. १४.०३.२०१९ रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील अधिकारी यांना मिळालेल्या माहीतीच्या अनुषंगाने मौजे वायंगणी गावठणवाडी ता. कणकवली या ठिकाणी छापा टाकुन एक १०,०००/- रुपये किंमतिची सिंगल बॅरलची ठासणीची बंदुक मिळून आल्याने आरोपीत याचे विरुद्ध भारतीय हत्यार अधिनियमान्वये कारवाई करण्यात आलेली असुन आरोपीत याचे विरुद्ध कणकवली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग श्री दिक्षीत गेडाम पोलीस, अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग श्री निमित गोयल यांचे मार्गदर्शनाखाली प्रल्हाद पाटील, पोलीस निरीक्षक,पोलीस उप निरीक्षक रविराज फडणीस, पोना/कृष्णा केसरकर, पोकॉ/रवि इंगळे, पोकॉ आजीनाथ ओंबासे, पोकॉ/ जॅक्सन घोन्सालवीस, मपोकॉ/ शितल नांदोसकर या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस पथकाने केलेली आहे. वरील कारवाई संदर्भात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांचे वरीष्ठांनी अभिनंदन केलेले आहे.

पोलीस अधिक्षक ,सिंधुदुर्ग